## नि.फौ.ख.क्र.४६०/२०२१ मधील निशाणी क्र.१ खाली आदेश

## (पारीत दिनांक २९ सप्टेंबर, २०२५)

सदर प्रकरणातील कागदपत्रांचे व रोजनाम्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदरचे दोषारोपपत्र हे दि.०२.१२.२०२१ रोजी दाखल करण्यात आले असुन दि.०४.०८.२०२२ रोजी आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३७९, ५११ सह १४९ अन्वये दोषारोप निश्चित करण्यात आले. तदनंतर सदर प्रकरणात शेवटचा साक्षीदार क्र.२ आशा रमेश मोहिते यांची साक्ष दि.१८.०३.२०२३ रोजी नोंदविली असता सदर साक्षीदार अभीयोग पक्षास फितुर झाला. त्यानंतर अभीयोग पक्षाने तपासी अधिकारी, श्री. ऋषीकेश अधिकारी यांना निशाणी ८९ वर साक्षी समन्स तामिल झाले असुनही सदर साक्षीदार साक्षीकामी हजर राहीला नाही. निशाणी ९० वर साक्षीदार प्रियंका सचिन सांगळे यांना समन्स तामिल झाले असता आजरोजी सदर साक्षीदार हजर राहीले असता अभीयोग पक्षाने सदर साक्षीदाराची साक्ष वगळली. तसेच साक्षीदार महादेव रामचंद्र झरांडे यांचा अहवाल निशाणी ९१ पाहिला असता त्यावर सदर साक्षीदार देवुळगावराजे येथे राहत नसल्याबाबत नमुद आहे. साक्षीदार सुनिल बबन जाधव यांना साक्षीसमन्स काढले असता सदर साक्षीदार हे नमुद पत्यावर राहत नसल्याबाबतचा अहवाल पोलिसांनी निशाणी ९२ वर दाखल केला. तसेच साक्षीदार युवराज डाळींबे हा मिळुन आला नसल्याबाबतचा अहवाल पोलिसांनी निशाणी ९३ वर दाखल केला.

२. सदर प्रकरण हे ४ वर्ष जुने असुनही प्रकरणात अभियोग पक्षातर्फे कार्यवाही केली जात नाही. एकंदरीत सदर प्रकरणात अभियोग पक्षास संधी देवुनही त्यांनी साक्षीदारांना साक्षीकामी हजर ठेवले नाही. करीता, अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात येतो. आरोपींविरुध्द अभीलेखावर पुरावा आला असल्यामुळे सदरचे प्रकरण आरोपींचे फौ.प्र.सं. ३१३ चे निवेदनाकामी नेमण्यात येते.

SHAILENDRA NANDKISHOR PATIL
(एस.एन. पाटील)

Digitally signed by SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Date: 2025.09.29 16:34:00 +0530

दौंड. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,

दि.२९/०९/२०२५ न्यायालय क्र.२, दौंड, जि. पुणे

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this PDF file judgment/order are same word for word as per original judgment"

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | M.M. Chintale |
| Court name | : | Shri. S.N. Patil<br>Judicial Magistrate F.C., Daund<br>Tq. Daund, Dist. Pune |
| Date of order | : | 29.09.2025 |
| Order signed by<br>Presiding Officer on | : | 29.09.2025 |
| Order uploaded on | : | 30.09.2025 |